# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.05.2024** **वारःशनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस; अखेरच्या टप्प्यात काल दिग्गज नेत्यांच्या प्रचार सभांचा धडाका.
2. मुंबईतल्या जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विरोधकांवर हल्लाबोल.
3. देशाचं संविधान कोणत्याही परिस्थितीत अबाधित ठेवू-कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचं ठाम प्रतिपादन आणि
4. अधिकाधिक मतदारांनी मतदान करावं- मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांचं आवाहन.

**<u>प्रचार संपणार</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार आहे. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात राज्यात सर्वच पक्षांच्या दिग्गज नेत्यांच्या सभांचा काल धुरळा उडाला. सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांवर टीकेची झोड उठवली तसंच मतदारांना आवाहनही केलं.

**<u>मोदी मुंबई</u>**

यंदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी विक्रमी जागा जिंकेलं असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत व्यक्त केला. मुंबईच्या सहा लोकसभा मतदारसंघातील एनडीएच्या उमेदवारांसाठी शिवाजी पार्क मैदानावर घेतलेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. देशाला 2047 पर्यंत विकसित करण्यासाठी आठवड्याचे सातही दिवस 24 तास कार्यरत आहे, असं मोदी म्हणाले. शांतता, सुरक्षा, मुलांचं उज्ज्वल भविष्य आणि भारताला जगात सन्मान मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचं आवाहन त्यांनी मतदारांना केलं. केंद्र सरकारनं गेल्या 10 वर्षात केलेल्या विकासकामांचा आढावा त्यांनी घेतला. आपल्या भाषणात विरोधकांवर टीकास्त्र सोडताना मोदी म्हणाले की निराशाग्रस्त लोकांना सर्वच गोष्टी अशक्य वाटतात. मात्र भाजपाने गोष्टी करुन दाखवल्या. इंडी आघाडीची माओवादी अर्थव्यवस्था मुंबईवर, देशावर गंभीर संकट आणू पाहत आहे, असा हल्लाबोल पंतप्रधानांनी केला. सभेला येण्यापूर्वी त्यांनी चैत्यभूमीवर जाऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि सावरकर स्मारकावर जाऊन स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन केलं. सभा संपल्यावर त्यांनी शिवाजी पार्कवरच्या बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाला अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मनसे प्रमुख राज ठाकरे, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतले अनेक वरिष्ठ नेते या सभेला उपस्थित होते.

**<u>महाविकास आघाडी-मुंबई</u>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेलं संविधान कोणत्याही परिस्थितीत अबाधित ठेवू; भाजपानं कितीही प्रयत्न केले तरी ते संविधानाला हात लावू शकणार नाहीत, असं प्रतिपादन कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी काल मुंबईत केलं. बीकेसी मैदानावर इंडी महाविकास आघाडीच्या परिवर्तन सभेत ते बोलत होते. इंडी आघाडी 300 चा टप्पा ओलांडणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सभेला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह इंडी आघाडीतील घटक पक्षांचे नेते उपस्थित होते. शरद पवार यांनीही, यावेळी भाजपा आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर जोरदार टीका केली. यावेळची लढाई ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं संविधान वाचवण्यासाठीची आहे, असं पवार म्हणाले. पंतप्रधान देशाला हुकूमशाहीकडे घेऊन जात असल्याची टीका केजरीवाल यांनी केली.

**<u>कोल्हे प्रचार-धुळे</u>**

आपल्या भागाचा सर्वांगीण विकास करणारा खासदार निवडून देण्याचं आवाहन खासदार अमोल कोल्हे यांनी काल धुळ्यात केलं. महाविकास आघाडीच्या उमेदवार शोभा बच्छाव यांच्या प्रचारासाठी कोल्हे यांनी सभा घेतली.

**<u>नीतिन गडकरी-धुळे</u>**

धुळे जिल्ह्यातील 200 गावांच्या सिंचनाचा प्रश्न सोडवणारी सुलावाडे -जामफळ-कनोली उपसा सिंचन योजना मंजूर झाली असून त्याचं 70 टक्के काम पुर्ण झालं आहे, असं प्रतिपादन ज्येष्ठ भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा इथं केलं. धुळे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार डॉक्टर सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.

**<u>तटकरे टीका-मुंबई</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोक वैफल्यग्रस्त झाल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत केली. अनिल देशमुखांना भाजपनं मंत्रीपद देण्यास नकार दिल्यानं ते तिथं राहिले असल्याचंही तटकरे यांनी सांगितलं. तटकरे यांनी नाशिक, पालघर मतदार संघातल्या राष्ट्रवादीचे प्रमुख नेते आणि विधानसभा सदस्यांबरोबर बैठका घेऊन संवाद साधला.

**<u>पाचवा टप्पा</u>**

राज्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात 13 मतदार संघासाठी येत्या 20 मे रोजी मतदान होत आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल मुंबईत पत्रकार परिषद घेतली. या टप्प्यातील मतदानासाठी 24 हजार 579 मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत. राज्यातल्या 13 मतदारसंघांत 2 कोटी 46 लाख 69 हजार 544 मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत आणि 264 उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याची माहिती त्यांनी दिली. सर्व पात्र मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावून मतदानाची टक्केवारी वाढवावी, असं आवाहन चोक्कलिंगम यांनी केलं. राज्यात चौथ्या टप्प्यात अकरा मतदारसंघामध्ये 62 पूर्णांक 21 टक्के मतदान झालं; 2019 च्या तुलनेत या आकडेवारीत एक टक्क्याने वाढ झाली असल्याचं ते म्हणाले.

**<u>जपान पॅरास्पर्धा</u>**

जपानमध्ये आजपासून जागतिक पॅराॲथलेटीक्स स्पर्धा सुरू झाल्या आहेत. या स्पर्धेत गोळाफेक प्रकारात भारतीय संघात सचिन खिलारे या महाराष्ट्राच्या एकमेव खेळाडूची निवड झाली आहे. मूळचा सांगली जिल्ह्यातला सचिन पुण्यामध्ये सराव करत आहे. 22 मे रोजी त्याची स्पर्धा होणार असून स्पर्धेतील आव्हाने, सराव, तयारी याविषयी आकाशवाणीशी बोलताना तो म्हणाला....

**<u>सीमा शुल्क</u>**

मुंबई विमानतळ आयुक्तालयाच्या सीमाशुल्क विभागाने 13 ते 16 मे कालावधीत साडेअकरा किलोहून अधिक सोने आणि सिगारेट जप्त केल्या आहेत. याचे मूल्य सव्वासात कोटी रुपयांच्या आसपास आहे. विविध 5 प्रकरणांमध्ये वेगवेगळ्या स्वरुपात सोने लपवल्याचं आढळून आलं होतं. यात काही भारतीय आणि परदेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे.

**<u>अटल मॅरेथॉन-सिंधुदुर्ग</u>**

नीती आयोग आणि अटल इनोव्हेशन मिशन आयोजित अटल मॅरेथॉन स्पर्धेत सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळच्या विश्वजीत परीटने राज्यात दुसरा तर देशात बारावा क्रमांक पटकावला आहे. कारखान्यांच्या परिसरात होणाऱ्या हवेच्या प्रदुषणावरील उपाय या संकल्पनेवर विश्वजीतने प्रकल्प सादर केला होता. त्याची निवड स्टुडंट आंत्रप्रन्युअर प्रोग्रामसाठी झाली आहे.

**<u>इअर टॅगिंग</u>**

पशुधनामधील सांसर्गिक रोगांना आळा घालण्यासाठी तसेच पशु आणि पशुधन उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी आपल्या पशुधनाच्या कानावर शिक्के म्हणजेच इअर टॅगिंग करून घेणे बंधनकारक असल्याचा निर्णय शासनानं

जारी केला आहे. या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश पुण्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी दिले आहेत. वाशिम जिल्ह्यातही, सर्व पशुधनाचे इअर टॅगिंग करुन त्यांची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक असल्याचे आदेश जिल्हाधिकारी बुनवेश्वरी एस. यांनी दिले आहेत. दरम्यान, कानावर शिक्के असल्याशिवाय एक जूननंतर कोणत्याही जनावरांची खरेदी विक्री करता येणार नाही, त्यामुळे जिल्ह्यातल्या पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे ईअर टॅगिंग करुन घ्यावे असे आवाहन पुणे जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धक अधिकारी विष्णू गर्जे यांनी केलं आहे.

**डाकिण यात्रा-नंदुरबार**

नंदुरबार जिल्ह्यात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तीन दिवसीय डाकिण प्रथा विरोधी संवाद यात्रेला कालपासून सुरुवात झाली. यात्रेचं उद्घाटन तळोदा इथं पोलिस पाटलांच्या परिषदेनं करण्यात आली. या प्रदेशात डाकिण प्रकरणातल्या गुन्ह्यात वाढ झाल्याची नोंद आहे. डाकिण प्रथा निर्मूलनासाठी व्यापक भूमिका ठरवण्याचा या यात्रेचा उद्देश आहे.

**शहीद काळे**

गाझामध्ये सेवा बजावताना वीरमरण आलेले शहीद निवृत्त कर्नल वैभव काळे यांच्यावर काल शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिस दलाच्या जवानांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून तर विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांनी शहीद कर्नल वैभव काळे यांना पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना दिली. भारतीय सैन्याच्यावतीने दक्षिण कमांडचे चीफ ऑफ स्टाफ मेजर जनरल आर. एस. सुंदरम यांनी पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना दिली.

**टेबल टेनिस**

जागतिक टेबलटेनिस फीडर स्पर्धेत भारतीय जोडी पोयमंती बैसया आणि आकाश यांनी मिश्र दुहेरीचे विजेतेपद पटकावले आहे. त्यांनी स्वदेशी जोडी अनिर्बन घोष आणि स्वस्तिका घोष यांच्यावर चुरशीच्या लढाईनंतर 3-2 असा विजय मिळवला.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मराठवाडा आणि विदर्भासाठी हाच इशारा उद्यापर्यंत राहील.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.